Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 780 – 783
DOI: 10.5281/zenodo.10279785

Original Research Article

# स्वातंत्र्याची 75 वर्ष आणि म. गांधी विचारांची आवश्यकता

प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे

शिवाजी महाविद्यालय हिंगोली ४३१५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: mukterd76@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी भारतीय विचारवंत व सामाजिक, आर्थिक आणि स्वातंत्र्याच्या जडणघडणमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका असणारे व्यक्तिमत्व आहे. भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला एक आदर्श विचार व विचार प्रणाली देणारे महत्त्वपूर्ण विचारवंत म्हणून जागतिक ख्याती असणारे महात्मा गांधी हे एक विचारवंत सादर आणि उच्च विचार, अहिंसा या प्रभावशाली व्यक्तिमत्वावर गांधी यांची आयुष्याच्या मार्गातून भारताला स्वातंत्र्य मिळून देणारे हे जागतिक नेते, स्वातंत्र्य सेनानी आहेत. जागतिक स्तरावर आजही महात्मा गांधी यांना मानणारा वर्ग आहे गांधी यांचे विचार प्रेरणा नवीन पिढीला माहिती व्हावी किंवा त्यांची जाणीव व्हावी म्हणून अनेक देशांमध्ये महात्मा गांधी यांच्या विचारांचे दर्शन व्हावे विचारांची जाणीव व्हावी यासाठी अनेक देश असे प्रयत्न करत आहेत. भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सव काळामध्ये महात्मा गांधी यांचे विचार भारताच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची आवश्यकता

महात्मा महात्मा गांधी हे सामाजिक आर्थिक विचारवंत यांच्या विचारातून सामाजिक परिवर्तन व सार्वभौम आर्थिक विकास साध्य होण्याची किमया आहे. महात्मा गांधी यांचा कालखंड आणि आजची परिस्थिती या दोन्ही बाजूंचा विचार केला तर असे दिसून येते की, ग्रामीण भागातील अवस्था ग्रामीण उद्योग,खेड्यांची स्वयंपूर्णता आदर्श खेड्यांची संकल्पना संकल्पना ही केवळ स्वप्नच असल्याचे दिसून येते आहे. भारतातील खेड्यांचे अस्तित्व हे शहरावर अवलंबित्व वाढत आहे खेड्यातील उद्योग बंद पडले किंवा बंद होण्याची चित्र आहे. आदर्श खेड्याची संकल्पना ही जवळपास संपुष्टातल्याची दिसून येते त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांचे खेड्याकडे शहराकडे होणारे स्थलांतर आणि सरकारचा

ग्रामीण भागाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा महात्मा गांधी यांच्या विचाराच्या अगदी विरुद्ध दिशेचा आहे.आज महात्मा गांधी यांच्या विचारांची आवश्यकता लक्षात येते आणि त्यामुळे प्रस्तुत संशोधनातून महात्मा गांधी यांच्या विचारातून भारताच्या एकूण समतोल विकासाचे चित्र उभे करता येते ही आवश्यकता लक्षात घेऊन त्यांचे विचार मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारतीय अर्थव्यवस्थेतील शहरी व ग्रामीण भागांच्या विकासाच्या विकासाचा आढावा घेणे.

२. अर्थव्यवस्थेतील ग्रामीण व शहरी भागांच्या विकाससंदर्भात महात्मा गांधी यांच्या विचारांचा अभ्यास करणे.

३. भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाची सद्यस्थिती आणि महात्मा गांधी यांच्या विचाराची आवश्यकता स्पष्ट करणे.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण व शहरी भागांचा आर्थिक विकास व महात्मा गांधी यांचे विचार**

महात्मा गांधी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण व शहरी भागांच्या विकासावर भर दिला आहे एवढेच नव्हे तर ग्रामीण व शहरी भागांचा समतोल विकास व्हावा ही प्रमुख भूमिका त्यांच्या विचाराची होती. ग्रामीण भागातील शहरे ही स्वयंपूर्ण असावी तसेच अर्थव्यवस्थेतील एकूण उद्योग व व्यवसाय हे स्वदेशी असावे अशी संकल्पना गांधी यांची होती. गांधी यांनी हाच मुख्य हेतू समोर ठेवून आपले विचार मांडले आहेत.

**ग्रामस्वराज्य**

महात्मा गांधी यांनी विशेषतः भारताच्या विकाससंदर्भात विचार मांडताना स्पष्ट केले की, भारत हा खेड्यांचा देश आहे त्यामुळे खेडे विकसित होणे ही काळाची गरज आहे. जर खेडे विकसित झाले तर भारत विकसित होईल. प्राचीन काळात भारतातील खेडे हे समृद्ध आणि स्वयंपूर्ण होती उत्पादन उपभोग आणि विभाजन ह्या तिन्ही प्रक्रिया आहे एकाच पातळीवर पार पडत होत्या परंतु बदलत्या परिस्थितीमध्ये यामध्ये बदल होऊन खेड्यातील स्वयंपूर्णता ही संपुष्टात आली आहे तेव्हा खेडे स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहेत. ही वास्तविकता गांधी यांनी मांडली होती तीच आज स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव सादर करताना फार बदललेली नाही आजही खेड्यातील उद्योग व एकूण अर्थव्यवस्थेचे पुनर्जीवन करणे काळाची गरज आहे.

**आदर्श खेड्यांची संकल्पना**

महात्मा गांधी यांनी खेडे कसे असावेत या संदर्भात एक विचार मांडला आहे आणि या विचाराला आपण आदर्श खेडी ही संकल्पना असे म्हणतात भारतामध्ये भारतामध्ये खेड्यात म्हणजेच ग्रामीण भागात राहणारे लोकसंख्या ही सामान्यपणे 60%टक्के आहे आणि त्यामुळे खेड्यांची संरचना कशी असावी या गांधी यांचे विचारांची आवश्यकता आहे. 'म.गांधी यांच्या मते खेडे हे एक आदर्श रचना असणारे छोटे गाव असावे ज्यामध्ये घरांची रचना एका लाईन मध्ये असावी,सांडपाण्याची व्यवस्थापन केले जावे पाणी रस्त्यावर आले नाही याची काळजी घेतली जावी.रस्त्याच्या कडेला झाडे असावे, खेड्यामध्ये बैठक व छोटेखानी कार्यक्रम करण्यासाठी समाज मंदिर असणे आवश्यक आहे.खेड्यात सुंदर अशी ज्ञान मंदिरे म्हणजे शाळा असाव्यात. खेड्यातील एका बाजूला उद्योग व्यवसायासाठी जागा आरक्षण करून त्या ठिकाणी

उद्योगांची उभारणी करावी'[1]. ही खेड्याची रचनात्मक पद्धती गांधी यांची आजही भारतामध्ये दिसून येत नाही तेव्हा गांधी यांच्या आदर्श खेडी संकल्पनेची आज भारताला आवश्यकता गरज आहे.

**सर्वोदय**

'सर्वोदय म्हणजे सामान्यपणे सर्वांचा उदय,विकास,कल्याण होय'[2]. गांधी यांच्या मते

समाजातील गरीब श्रीमंत असं सर्वात वर्गांचा विकास होणार आवश्यक आहे तेव्हाच एकूण राष्ट्राचा विकास होईल समाजामध्ये गरीब आणि श्रीमंती अशी दरी निर्माण झाली तर त्यामधून गरिबांची श्रीमंत वर्ग विषयी असलेली विचार श्रेणी ही वेगळी असेल ती एकूण विकासाला अडसर निर्माण होईल.त्यामुळे वर्ग विरहित समाज निर्माण व्हावा हि आपेक्षा गांधी यांनी व्यक्त केली आहे. आजही भारतातील समाजाचा विचार केला असता हीच अपेक्षा व्यक्त होते.

**विश्वस्त संकल्पना**

म.गांधी यांच्या विचारांमध्ये त्यांच्या विश्वस्त संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान आहे. महात्मा गांधी यांच्या मते समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी विश्वस्त संकल्पनेचा स्वीकार करणे गरजेचे आहे. विश्वस्त म्हणजे आपल्याकडे असलेली संपत्तीचा मालक मी स्वतः नसून ती त्यावर संपूर्ण समाजाचा मालकी हक्क आहे ही भावना असणे होय.'विश्वस्ताला फक्त जनता सोडून इतर कोणताही वारसा नसतो.'[3]

गांधी यांच्या विश्वास संकल्पनेची गरज आज भारताला आहे.

**स्वदेशीचा स्वीकार**

महात्मा गांधी यांच्या मते, 'माझा चरखा माझे स्वराज्य, प्रत्येक भारतीयांनी भारतात निर्माण होणाऱ्या वस्तूंचा वापर करावा ज्यामुळे भारतातील वस्तू व सेवांचा वापर होऊन अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल व त्यातून संपूर्ण समाजाचा विकास होईल.'[4] जागतिकीकरणाच्या काळात आज स्वदेशी वस्तूचा वापर करणे ची गरज निर्माण झाली आहे भारतातील बाजारपेठेवर व भारतात उत्पादन होणाऱ्या उत्पादनाला पर्याय म्हणून विदेशातील वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणात होत आहे. जागतिकीकरणामुळे आपण यावर नियंत्रण आणू शकत नाही तेव्हा देशातील वस्तूंचा उत्पादन वापर होण्यासाठी स्वदेशी संकल्पनेचा स्वीकार करण्याची गरज आज आहे.

**निष्कर्ष**

संशोधनाचे निष्कर्ष सांगता येतात की,स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आज आम्ही साजरा करीत आहोत ही आनंदाची व स्वाभिमानाची गोष्ट आहे. परंतु स्वातंत्र्याच्या 75 वर्षांमध्ये आपण काय प्रगती केली की, ज्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी असलेली प्रश्न आज संपुष्टात आली आहेत. यावर जर शांतपणे चिंतन केले तर अशी स्थिती दिसून येते की, भारतामध्ये आजही स्वातंत्र्यपूर्वी असलेली प्रश्न जसे की, दारिद्र्य,आर्थिक विषमता, बेरोजगारी हे मूलभूत समस्या संपलेल्या नाहीत. ह्या समस्या आजही अर्थव्यवस्थेत एक आव्हाने म्हणून आम्ही यांना सामोरे जात आहोत. आधुनिकीकरण, उत्पादन,चैनीचे जीवनशैली यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला तरीही याचा लाभ मात्र समाजातील शेवटच्या घटकाला मिळतोच असे नाही. जागतिकीकरणामुळे विदेशी वस्तू सेवांची आयात भारतामध्ये मोठ्या प्रमाणात होते आहे. खाजगीकरणाला

चालना देण्यात येत आहे. यामुळे भारतासारख्या अर्थव्यवस्थेत भांडवलाचा भाव आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे विदेशी गुंतवणूकदार अर्थव्यवस्थेत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दुसऱ्या बाजूने मोठ्या प्रमाणात आयात वाढल्यामुळे भारतात उत्पादन होणाऱ्या वस्तूंना पर्याय वस्तू स्वस्त किंमतीमध्ये उपलब्ध होतात आणि त्यामुळे भारतीय वस्तूंची मागणी कमी होणे व भारतातील उद्योग बंद पडण्याची स्थिती निर्माण होणे ही भीती निर्माण झाली आहे. खाजगीकरणामुळे गरीब हा गरीब व श्रीमंत हा श्रीमंत होण्याची स्थिती भविष्यात निर्माण होते आणि त्यातून आर्थिक विषमता सारखा प्रश्न उभा टाकतो काय हा प्रश्न अभ्यासकासमोर आहे. शहरी करणाचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील जनतेचे शहराकडे होणारे स्थलांतरण व भारतातील खेडी ऊस पडण्याची भीतीअशा स्थितीत महात्मा गांधी यांच्या स्वदेशी स्वदेशी विश्वस्त सर्वोदय खेड्यांची स्वयंपूर्णता या संकल्पनेची आवश्यकता आहे असा निष्कर्ष संशोधनाअंती सांगता येतो.

**संदर्भ सूची**


१. एम. के. गांधी, (अनुवाद काशिनाथ त्रिवेदी) 1957, आत्मकथा आत्मकथा पृष्ठ क्रमांक 384

२. T.N. Hajela, 1978, History of Economics Thoughts P.no. 540

३. कित्ता पृष्ठ क्रमांक 537.

४. हरिभाऊ उपाध्याय, 2010 बापू कथा १९२० ते १९४८ पृष्ठ क्रमांक 155.

५. विद्याधर पटवर्धन 'आर्थिक विचारांचा इतिहास'

६. के. एच. ठक्कर 'आर्थिक विचारांचा इतिहास'.